# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली, जिल्हा - रत्नागिरी.

## ‘प्रकल्पग्रस्त’ व्यक्तींसाठी विशेष भरती मोहिम

जा.क्र.बासाकोकृवि/आस्था/ब—२/प्र.ग्र./ ३४४ /२०१८, दिनांक : १५ जानेवारी, २०१८.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या आस्थापनेवरील गट—ड संवर्गातील प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित असलेल्या पदांकरीता या जाहिरातीद्वारे **दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत** विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव/ वेतनश्रेणी | रिक्त पदांचा प्रवर्ग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.जा. | अ.ज. | विजा/भज | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| १. | **मजूर** (मजूर, बैलवाला, नागंरवाला, दुधवाला, वासरेवाला)<br>(वेतनश्रेणी रू.४४४०-७४४०, ग्रेडवेतन रू.१३००/-)<br>१. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठासाठी भूसंपादन झालेल्या प्रकल्पग्रस्तांसाठी ११ जागा राखीव (अजा-२, विजाअ-१, इमाव-२ व खुला-६).<br>२. उर्वरीत १० जागा महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्तांसाठी खुल्या राहतील. | ३ | १ | २<br>विजा(अ) | - | ४ | ११ | २१ |
| २. | **शिपाई** (शिपाई, परिचर, प्रयोगशाळा सेवक, प्रयोगशाळा परिचर, संदेशवाहक, टाकी परिचर, मेहतर)<br>(वेतनश्रेणी रू.४४४०-७४४०, ग्रेडवेतन रू.१३००/-)<br>१. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठासाठी भूसंपादन झालेल्या प्रकल्पग्रस्तांसाठी ३ जागा राखीव (अजा-१, इमाव-१ व खुला-१).<br>२. उर्वरीत ३ जागा महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्तांसाठी खुल्या राहतील. | १ | १ | - | - | १ | ३ | ६ |

अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी संपूर्ण जाहिरात, अर्जाचा नमुना व दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

### उपरोक्त पदांची किमान शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

१. मजूर :—
इयत्ता चौथी उत्तीर्ण.

२. शिपाई :—
माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.

## अर्ज करावयाची पध्दत

उपरोक्त पदांची किमान शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी खालीलप्रमाणे विहीत केलेल्या नमुन्यातील अर्ज शैक्षणिक व अन्य दाखल्यांच्या **सत्यप्रती** (True Copies)/**स्वयंसाक्षांकित** प्रतीसह **मा. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी (पिन–४१५ ७१२)** यांचेकडे **दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८** पर्यंत पाठवावा.

## अर्जाचा नमुना

| उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

१) जाहिरातीतील ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव :– ........................................................

२) पदाचा जाहिरातीतील अनुक्रमांक :– ........................................................

३) अर्जदाराचे संपूर्ण नाव :– .........(आडनांवाने सुरुवात करावी)...........

४) सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता :– ........................................................

५) कायमचा पत्ता :– ........................................................

६) दूरध्वनी क्रमांक :– ........................................................

७) जन्मतारीख (अंक व अक्षरामध्ये) :– ........................................................

८) अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकाच्यावेळी असलेले वय :– ......... वर्षे, .......... महिने, ......... दिवस

९) अर्जदाराची जात आणि प्रवर्ग :– जात ......., प्रवर्ग ......

१०) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केला आहे (जाहिरातीमधील अट क्र.३ अन्वये) :– प्रवर्ग (अ.जा./अ.ज./वि.जा./ भ.ज. /इ.मा.व./वि.मा.प्र./खुला)

११) अर्जदार अपंग प्रवर्गातील असल्यास अपंगत्वाचा प्रकार आणि टक्केवारी. :– ........................................................

१२) शैक्षणिक अर्हता :–

| अ. क्र. | उत्तीर्ण परिक्षेचे नांव | बोर्ड/विद्यापीठ संस्थेचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | वर्ग/ श्रेणी | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|

१३) अनुभव :– ......... वर्षे ..........महिने ..........दिवस

| अ. क्र. | नियुक्त्याचे नांव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | कालावधी | | | | | हाताळीत असलेल्या कामाचे स्वरूप | नोकरी सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून (दिनांक) | पर्यन्त (दिनांक) | एकूण कालावधी | | | | |
| | | | | | वर्ष | महिने | दिवस | | |

१४) उपरोक्त पदासाठी अन्य काही विशेष प्राविण्य अवगत असल्यास त्याबाबतची माहिती

१५) डिमांड ड्राफ्ट क्र........................, दिनांक ............................., रक्कम रु. ............... (अक्षरी रु. ........................................................).

## प्र मा ण प त्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, मी वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, मी वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास त्या माहिती आधारे मिळवलेली नोकरी गमावण्यास बांधील राहीन व त्याबद्‌ल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

(अर्जदाराची सही, संपूर्ण नांव व दिनांक)

## प्रतिज्ञापन

### नमुना "अ" (नियम -४)

मी, ................................................ श्री. ............................................................ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ....... वर्षे, राहणार ...................................................... याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी, ................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ..................... आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा).

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : ( अर्जदाराचे नांव व सही )

**<u>टिप</u> :- अर्जदार जरी अविवाहीत असेल, तरी त्याने कुटुंब प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक आहे.**

# <u>अर्ज भरण्याकरिता सूचना/सर्वसाधारण अटी</u>

१. अर्जदाराने प्रकल्पग्रस्त व्यक्तीला अथवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटूंबातील तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला नोकरीविषयक सवलतीच्या संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांनी म्हणजेच जिल्हाधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी/जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांनी निर्गमित केलेला 'प्रकल्पग्रस्त' दाखला सत्यप्रतीत सोबत जोडणे आवश्यक आहे. सदरची विशेष भरती मोहिम फक्त 'प्रकल्पग्रस्त' व्यक्तींसाठी आहे. प्रकल्पग्रस्तांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२. **डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठासाठी जमीन संपादित प्रकल्पग्रस्तानी उर्वरित महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांसाठी रिक्त असलेल्या जागांसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी केलेल्या अर्जांचा विद्यापीठासाठी व उर्वरित महाराष्ट्रासाठी प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेल्या जागांसाठी विचार करण्यात येईल.**

३. मजूर आणि शिपाई पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास दोन स्वतंत्र अर्ज सादर करावेत. तथापि, खुल्या प्रवर्गाकरीता आणि आरक्षित प्रवर्गाकरीता अर्ज करावयाचा असल्यास तो स्वतंत्ररित्या न करता एकच अर्ज सादर करावा. मागासवर्गीय उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्यातील रहिवासाचे तसेच महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला व अद्ययावत नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र त्याने सादर करणे आवश्यक आहे. अन्य राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठीच अर्ज करता येईल.

४. वरिल पदांसाठी अर्ज पाठवितांना खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी शुल्क रू.३००/—(रूपये तीनशे मात्र) व मागासवर्गीय उमेदवारांनी शुल्क रू. १५०/— (रूपये एकशे पन्नास मात्र) रक्कम **राष्ट्रीयकृत बॅंकेच्या धनाकर्षाद्वारे** भरावयाची आहे. धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) हा **'नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली'** या नावे काढून तो अर्जासोबत जोडावा. उमेदवारांनी धनाकर्षाच्या मागील बाजूस डाव्या कोपऱ्यात स्वत:चे सूंपर्ण नांव व जाहिरातीतील पदनाम लिहावे. विहित शुल्क न भरल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. **अपंग/माजी सैनिक उमेदवारांनी अर्जासोबत शुल्क पाठविण्याची आवश्यकता नाही.**

५. परिपूर्ण स्थितीतील अर्ज **"कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी (पिन—४१५ ७१२)"** या पत्त्यावर **दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८** रोजी अथवा तत्पूर्वी पोहोचतील असे पाठवावेत. नमूद केलेल्या तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदर पदासाठी विहीत केलेला अनुभव व शैक्षणिक अर्हता उमेदवाराने अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेस म्हणजेच **दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८** रोजी धारण करणे आवश्यक आहे. अर्जदाराने प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात कोणतेही मूळ प्रमाणपत्र अर्जासोबत जोडू नये. मूळ अर्ज या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर कोणतेही कागदपत्र अथवा दाखले जोडून घेण्यात येणार नाहीत. जाहिरातीतील पदासाठी विहित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. <u>**उमेदवाराने अर्ज सादर करतांना लखोटयावर ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचा स्पष्ट उल्लेख करावा.**</u>

६. उमेदवाराचे वय **दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८** रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी शासनाच्या प्रचलित नियमानुसार उच्चतम वयोमर्यादा ५ वर्षाने शिथील म्हणजेच ४३ वर्षे इतकी राहील. तसेच अपंग व प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. तसेच माजी सैनिकांसाठी शासन निर्णय क्र.मासैक—१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६—अ, दिनांक २० ऑक्टोबर, २०१० मधील तरतूदीनुसार उच्चतम वयोमर्यादा शिथिल राहिल. या विद्यापीठामध्ये काम केलेल्या रोजंदारी मजूरांसाठी उच्चतम वयोमर्यादा शिथील करण्यात आली आहे. उमेदवाराचे वय प्रमाणित करण्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला अथवा वय अधिवास प्रमाणपत्र सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. या विद्यापीठामध्ये काम केलेल्या रोजंदारी मजूरांनी विद्यापीठामध्ये काम केल्याबाबतचे संबधित कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

७. शासन निर्णय क्र.कृविआ—११०६/प्र.क्र.११५/६अे, दिनांक २९ जानेवारी, २००९ मधील शारिरीक पात्रतेच्या निकषानुसार शिपाई या पदासाठी 'अस्थिव्यंग' उमेदवार अपात्र ठरतील.

८. सदरची जाहिरात बिंदूनामावलीच्या मान्यतेच्या अधिन राहून करण्यात आली आहे. भरावयाच्या पदांची संख्या आरक्षण बिंदुनूसार कमी किंवा अधिक होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत/आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा कोणताही वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

९. निवड झालेल्या उमेदवारांना डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात कोठेही नेमण्यात अगर बदली करण्यांत येईल.

१०. रिक्त पदासाठी जाहिरात देण्यांत आली याचा अर्थ जाहिरातीत नमूद केलेली सर्व पदे भरली जातील असा होत नाही. याबाबतचा पूर्ण अधिकार विद्यापीठाच्या अखत्यारित राहील.

११. उमेदवाराने त्याच्या जातीचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र संबंधित समुचित अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. विजा/भज/विमाप्र व इमाव इत्यादी आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी आरक्षित पदासाठी अर्ज करताना **सन २०१७–२०१८ चे वैध** नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.

१२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन दिनांक २८/०३/२००५ ची अधिसूचना आणि दिनांक २८/०४/२००५ च्या राजपत्रानुसार सर्व विवाहित तसेच अविवाहित अर्जदारांनी जाहिरातीत दिलेल्या विहित नमुना–अ मध्ये कुटुंबासंबंधी प्रतिज्ञापन अर्जासोबत सादर केलेच पाहिजे. **प्रतिज्ञापन सादर न केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.**

१३. टपाल खात्याच्या कोणत्याही विलंबास अथवा टपाल गहाळ झाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही व कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४. शासन परिपत्रक अनिओ/१००५/१२६/सेवा–४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार नव्याने नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

१५. उमेदवारांनी जाहिरातीला अनुसरुन अर्ज विद्यापीठ कार्यालयात सादर करण्यापूर्वी संबंधित पदास ते पात्र असल्याची खात्री करुन घ्यावी.

१६. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर पात्रतेबाबत कोणताही पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

१७. भरती प्रक्रिये दरम्यान जर एखादया उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल.

१८. प्राप्त अर्जाची संख्या विचारात घेवून लेखी परिक्षा घेणेत येईल. जाहिरातीतील ज्या पदांसाठी लेखी परिक्षा विहीत करण्यात येणार आहे त्या लेखी परिक्षेसाठी विहीत करण्यात आलेला अभ्यासक्रम, वेळापत्रक इ. तपशिल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यईल.

१९. **जाहिरातीतील कोणत्याही पदावर निवड करुन घेण्यासाठी उमेदवाराने अयोग्य मार्गाचा अवलंब केल्यास संबंधित उमेदवाराला भरती प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.**

२०. मुलाखतीस हजर राहणेसाठी येणाऱ्या उमेदावारांना कोणत्याही प्रकारचा भत्ता अगर प्रवास भाडे देण्यात येणार नाही.

२१. संबंधित पदाची किमान शैक्षणिक अर्हता, वय, जात, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र आणि अनुभव प्रमाणित करणारे दाखले सत्यप्रतीत सादर न केल्यास सदर अर्ज अपूर्ण असल्याचे गृहित धरुन उमेदवारास लेखी परिक्षेस अपात्र ठरविण्यात येईल. अर्जदाराने स्वयंसाक्षांकीत प्रमाणपत्रांच्या प्रती जोडल्यास **स्वयंघोषणापत्र** सादर करणे आवश्यक राहील. त्याअभावी उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

२२. अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी स्वाक्षांकीत करुन पृष्ठ क्रमांकासह अर्जासोबत सादर करावी.

२३. उमेदवाराने नावातील बदलाबाबतच्या राजपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. उमेदवाराने नावातील बदलाचा पुरावा अर्जासोबत सादर केला नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात यईल.

२४. नोकरभरती बाबत कोणाही व्यक्तीने अर्जदारास कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखविल्यास, अर्जदारने त्वरीत नजिकच्या पोलिस ठाण्याशी संपर्क साधून संबंधिताविरुध्द तक्रार दाखल करावी. अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारीस विद्यापीठ प्रशासन जबाबदार असणार नाही.

२५. संपूर्ण जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
संकेत स्थळ :– **http://www.dbskkv.org recruitment**

(एस. एस. नारखेडे)
कुलसचिव,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.